
माधवानंद गव्हाने यांच्या मु. बेळंकी, जि. सांगली येथील अतिघन लागवड केशर आंबा बाग

# आंब्याची आधुनिक अतिघन लागवड

※ अतिघन लागवडीमुळे एकरी झाडांची संख्या १० ते १५ पट वाढते. उत्पादनात २.५ ते ३ पट वाढ होते. तिसऱ्या वर्षी व्यापारीकदृष्ट्या फळांचे चांगले उत्पादन मिळू शकते.

डॉ. भगवानराव कापसे
E-mail- bmkapse@gmail.com
Mob.No.9422293419

१९८० पर्यंत आंब्याची १३ X १३ मी. तर नंतर १० X १० मी. लागवडीची शिफारस होती ती १९९०-९५ दरम्यान आम्हीच औरंगाबाद भागात सघन पद्धतीने म्हणजे ५ X ५ किंवा ५ X ६ मिटर करण्यास सुरुवात केली.

२००६ नंतर मात्र अतिघन म्हणजे १.५ X ४ मीटर वर सुरु झाली. आता हीच पद्धत कोकणाव्यतिरिक्त महाराष्ट्रात सर्वत्र मोठ्या प्रमाणात वापरण्यात येऊ लागली असून, सर्वत्र शेतकरी अतिशय चांगल्या पद्धतीने आंबा उत्पादन करून द्राक्षापेक्षाही एकरी जास्त अर्थार्जन करू लागले आहेत.

अतिघन पद्धतीने लागवड करताना चौरस पद्धतीने न करता आयताकृती पद्धतीनेच करावी. तसेच झाडाचा घेरनियंत्रित ठेवण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने छाटणी तसेच वाढरोधक इ. बाबींचा वापर करावा लागतो.

## ※ अतिघन लागवडीचे फायदे

i) ठराविक क्षेत्रातून अधिक उत्पादन. झाडे लहान असल्याने फळांची विरळणी, फवारणी, छाटणी, अंतरमशागत इ. कामे करणे सोपे होते.

ii) आंबा फळे झेल्याएवजी हाताने व्यवस्थित काढता येतात.

iii) फळांची निर्यातयोग्य गुणवत्ता येण्यासाठी सहज उपाय करता येतात.

iv) दोन ओळींत अंतर असल्याने फवारणी, खते देणे, अंतरमशागत तसेच फळांची अंतर्गत वाहतूक इ. कामे ट्रॅक्टरने सहज करता येतात.

| अ. क्र | विवरण | सर्वसाधारण लागवड (१०x१० मी) | घन लागवड ५x५ मी. ५x६ मी. | अतिघन लागवड |
|---|---|---|---|---|
| १ | एकरी झाडांची संख्या | ४० | १७०-२०० | ५००-६६६ |
| २ | प्रथम पीक सुरु होण्याचा कालावधी (वर्षे) | ७-९ | ४-५ | ३-४ |
| ३ | बाग पूर्ण फळांत येण्यास लागणारा कालावधी (वर्षे) | १२-१५ फारच जास्त | ७-५ मध्यम | ४-५ फारच कमी |
| ४ | उत्पादन (टन) अ) चांगले उत्पादन देणाऱ्या जातीत ब) कमी उत्पन्न देणाऱ्या जातीत | ४-५ | ७-८ | १०-१२ |
| ५ | बागेचे व्यापारीकदृष्ट्या आयुर्मर्यादा (वर्षे) | ५० पर्यंत | ३०-३५ अंदाजित | २५-३० अंदाजित |

※ सर्वसाधारण, घन व अतिघन लागवड पद्धतींचा तुलनात्मक अभ्यास

अतिघन लागवड केलेल्या बागेस खत व्यवस्थापन अतिशय शास्त्रीय पद्धतीने करणे आवश्यक ठरते.

## ※ अतिघन लागवड पद्धत

※ **नाली खोदणे** : आंबा लागवडीसाठी साधारणत: १ बाय १ बाय १ मीटरचा खड्डा खोदून भरुन घेणे आवश्यक असते. मात्र अतिघन लागवडीत दोन झाडंतील अंतर अतिशय कमी असल्याने जेसीबी यंत्राने एक मीटर रुंद व एक मीटर खोल नाली खोदून घ्यावी.

※ जमीन हलकी असेल तर ६० टक्के गाळ आणि ४० टक्के नालीतील मुरमाड माती अशा मिश्रणाने भरून घ्यावी तसेच लागवडीच्या ठिकाणी शेणखत, स्फुरद योग्य पद्धतीने मिसळावे.

※ लागवडीच्या ठिकाणी कलमाची पिशवी बसेल असा लहानसा खड्डा खणावा. त्यामध्ये ५०० ग्रॅम लिंबोळी पेंड, २५ ग्रॅम ट्रायकोडर्मा, २५ ग्रॅम अॅझोटोबॅक्टर व २५ ग्रॅम पीएसबी जिवाणूसंवर्धक मिसळून कलम लागवड करावी.

## ※ आच्छादनाचा वापर

अतिघन लागवड केलेल्या बागेत दरवर्षी कलमाखालील संपूर्ण सावलीत उसाचे पाचट, वाळलेले गवत किंवा साळीचे तणसाचे आच्छादन करावे.

## ※ वारा प्रतिबंधक झाडांची लागवड

कलमांना हिवाळ्याच्या शेवटी फळधारणा सुरू होते. फळांची संपूर्ण वाढ ही भर उन्हात होते. या काळात ऊन तसेच गरम हवेपासून बाग व फळांचे संरक्षण करण्यासाठी बागेभोवती सरू, महागणी अशा या उंच वाढणार्या वारा प्रतिबंधक वृक्षांची लागवड करावी.

## ※ फळांची छाटणी


※ फळधारणा सुरू झाल्यानंतर दरवर्षी बागेत शास्त्रीय पद्धतीने छाटणी करावी.

※ मागील वर्षातील फळकाढणी होताच लगेच शास्त्रीय पद्धतीने झाडांची छाटणी करावी. नंतर आलेल्या नवीन पालवीचे करपा रोग किंवा पाने खाणार्या अळींपासून संरक्षण करावे.

※ लगेच पुढील वर्षी चांगला मोहोर येण्यासाठी शिफारशीत प्रमाणात पॅक्लोब्युट्राझोल या वाढ निरोधकांचा वापर करून चांगली फळधारणा करून घ्यावी.

## ※ कलमांना वळण

※ कलम दीड ते दोन फुट उंचीचे होईपर्यंत एकच खोड राहू द्यावे. नंतर शेंडा मारावा. त्या ठिकाणाहून ३ ते ४ फांद्या निघतील, त्यातील चांगल्या व भरगोस वाढलेल्या तीन फांद्या ठेवाव्यात. परत या फांद्यांचा दोन ते तीन पेरानंतर शेंडा मारावा. अशाप्रकारे कलमांचा सांगाडा तयार करून घ्यावा.





※ आपल्याकडे केशर १५-२० मे नंतर काढणीस येतो. त्याचवेळी गुजरातचा केशरही येतो, त्यामुळे भाव कोसळतात, मात्र अतिघन लागवड पद्धतीत आधुनिक तंत्रज्ञान वापरुन ४०-५०% आंबा हा एप्रिल मध्ये तर १५ मे पर्यंत ६०-७०% आंबा काढणीस येतो, त्यामुळे बागायतदारांना उच्चतम भाव मिळतो. ह्याच कारणाने आणि उत्पादकतेत झालेल्या वाढीमुळे शेतकर्यांना चार ते साडे सहा लाख रुपयांपर्यंत एकरी उत्पादन मिळत आहे.


※ महाराष्ट्रात २०२० ला महा केशर आंबा बागायतदार संघाची स्थापना झाली. संघाच्या माध्यमातून प्रत्यक्ष शेतावर जाऊन तसेच वेबिनार, व्हाट्स ॲपच्या माध्यमातून मोठ्याप्रमाणात तंत्रज्ञान विस्तार करण्यात येत आहे. भविष्यात महा केशर च्या माध्यमातून निविष्टा पुरवठा, आधुनिक रोप वाटिका, विक्री, निर्यात इ. बाबत येत आहे.


※※※

**लेखकाचा अनुभव :**
दक्षिण आफ्रिकेतील एका फार्मवर २५०० एकर क्षेत्रामध्ये आंबा कलमांची १ X ३ मीटर, १.५ X ४ मीटर, १.५ X ६ मीटर अंतरावर केलेली आहे ती सुमारे २० वर्षांपूर्वीच असून, त्यातून एकरी २० ते २५ टन उत्पादन येत असल्याचे प्रत्यक्ष पाहिलेल आहे.


सघन पद्धतीने करा आंबा लागवड


दक्षिण आफ्रिकामधील अतिघन लागवड बागेत फळाला कॅपिंग केलेले


दक्षिण आफ्रिकामधील फळांनी लगडलेली अतिघन आंबा लागवड


दक्षिण आफ्रिकामधील फळांनी लगडलेली अतिघन आंबा लागवड